दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ७ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.८ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# महागाई विरोधात १३ एप्रिल रोजी महाविकास आघाडीचा महामोर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पेट्रोल आणि डिझेलच्या सलग नवव्या दिवशी वाढणाऱ्या किमती. गगनाला भिडणारे एलपीजी गॅसचे दर या सगळ्याचे थेट परिणाम महागाईवर होत आहेत. कोरोना महामारी नंतर सावरणाऱ्या सामान्य जनतेला खरे तर केंद्र सरकारने दिलासा देणे अभिप्रेत होते. परंतु दिलासा देणे राहिले दूर, सामान्य जनतेला महागाईच्या दरीत लोटण्याचे पाप केंद्रातील मोदी सरकार करत आहे. या विरुद्ध सामान्य जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी पनवेल-उरण महा विकास आघाडीच्या वतीने १३ एप्रिल रोजी महामोर्चा काढण्याचे नियोजन सुरू केले आहे. या महामोर्चा मध्ये कार्यकर्त्यांनी जास्तीत जास्त त्रस्त नागरिकांपर्यंत पोहोचावे व त्यांना महामोर्चात सहभागी होण्यासाठी उद्युक्त करावे या उद्देशाने पनवेल उरण महा विकास आघाडीच्या वतीने जिल्हा परिषद गटनिहाय दौऱ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दौऱ्याला मंगळवार दिनांक ५ एप्रिल पासून प्रारंभ करण्यात आला आहे.**



दिनांक ४ व ५ रोजी जिल्हा परिषद गट निहाय बैठकांचे आयोजन करण्यात आले असून पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिक व कार्यकर्त्यांसाठी शनिवारी बैठकांचे आयोजन करण्यात आलेले आहे. मंगळवार दिनांक ४ मार्च रोजी वावंजे, नेरे, पळस्पे, पाली देवद या जिल्हा परिषद मतदार संघात बैठका संपन्न झाल्या. तर बुधवारी गुळसुंदे, केळवणे, गव्हाण आणि वडघर या जिल्हा परिषद मतदारसंघांमध्ये बैठक आयोजित करण्यात आली आहे. शनिवारी नावडे तळोजे विभागातील नागरिक व कार्यकर्त्यांसाठी नावडे हायस्कूल येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. खारघर विभागातील नागरिकांकरिता शिवसेनेचे जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या कार्यालयात बैठक आयोजित केली आहे. कळंबोली विभागातील नागरिक व कार्यकर्त्यांना मोर्चाचे नियोजनाबाबत अवगत करण्यासाठी नगरसेवक सतीश पाटील यांच्या न्यू इंग्लिश हायस्कूल,कळंबोली येथे बैठक आयोजित केली जाणार आहे. कामोठे विभागासाठी माजी आमदार दत्तूशेठ पाटील हायस्कूल कामोठे येथे बैठक होणार असून पनवेल विभागातील नागरिकांची बैठक व्ही के हायस्कूल येथे आयोजित केली जाईल. अशी माहिती पनवेल उरण महा विकास आघाडीचे अध्यक्ष बबन दादा पाटील आणि सचिव सुदाम पाटील यांनी दिली.




मंगळवारी झालेल्या आढावा बैठक यांना कार्यकर्ते व नागरिकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. या बैठकांना आमदार बाळाराम पाटील, पनवेल शहर काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष आर सी घरत, शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार बबन पाटील, माजी नगराध्यक्ष जे एम म्हात्रे, माजी आमदार मनोहर भोईर, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड, जी आर पाटील, समाजवादी पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष अनिल नाईक, पुरोगामी युवक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष देवेंद्र पाटील, यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एटीएम कार्ड एक्सेंज करून फसवणूक करणाऱ्या ८ जणांच्या टोळीस ८९ एटीएम कार्डसह अटक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

एटीएम सेंटर मध्ये पैसे काढण्यास गेलेल्या ग्राहकाला विचलीत करुन पैसे काढण्यास मदत करण्याच्या बहाण्याने त्याचा पिन नंबर जाणून घेवून हातचलाकीने एटीएमची अदलाबदल करून स्वतःजवळील त्याच बँकेचे ब्लॉक झालेले एटीएम त्या ग्राहकास देवून त्याचे चालू कार्ड स्वत:कडे घेवून त्याद्वारे पैसे काढून सर्वसामान्य लोकांची फसवणूक करणा-या बिहार राज्यातील ०८ जणांच्या टोळीस पनवेल शहरातील काही एटीएम सेंटरवर घातक शस्त्रांसह दरोडा टाकण्याच्या तयारीत असताना गुन्हे शाखा, कक्ष २, पनवेल यांनी अटक करुन त्यांच्या ताब्यातून घातक शस्त्रांसह विविध बँकांचे ८९ एटीएम कार्डस हस्तगत केले.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये एटीएम सेंटर मध्ये पैसे काढण्यास गेलेल्या ग्राहकाला विचलीत करून पैसे काढण्यास मदत करण्याच्या बहाण्याने त्याचा पिन नंबर जाणून घेवून हातचलाकीने एटीएमची अदलाबदल करुन स्वतःजवळील त्याच बँकेचे ब्लॉक झालेले एटीएम त्या ग्राहकास देवून त्याचे चालू कार्ड स्वत:कडे घेवून त्याद्वारे पैसे काढून सर्वसामान्य लोकांची फसवणूक होत असल्याबाबत अनेक तकारी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील विविध पोलीस ठाणेस प्राप्त झाल्या होत्या. नागरीकांमध्ये पोलीसांविषयी विश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सुरेश मेंगडे यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे), विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या वेगवेगळया टिम तयार करण्यात आल्या होत्या. गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली मागील काही दिवसांपासून फसवणूक झालेल्या लोकांकडून कशाप्रकारे फसवणूक झाली याची माहिती घेवून संबंधित एटीएम सेंटरमधील सीसीटीव्ही फुटेज, डमडाटा याचा अभ्यास करत

.../२

## कर्जत उपविभाग महसूल कर्मचारी बेमुदत संपावर ; संपाचा चौथा दिवस

**दै.रायगड नगरी । कर्जत**

दोन वर्षांपासून पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने रायगड जिल्ह्यातील शेकडो महसूल कर्मचारी ४ एप्रिल पासून बेमुदत संपावर गेले आहेत. संपाचा आजचा चौथा दिवस आहे,यामुळे जिल्ह्यातील, तालुक्यातील महसूल विभागातील कामकाज ठप्प झाले आहे.

राज्यातील महसूल विभाग आणि जिल्ह्या-तील महसूल संघटनांनी २१ मार्च २०२२ पासून निदर्शने, काळ्या फिती लावून काम, एक दिवसाचा लाक्षणिक संप अशी आंदोलने केली आहेत.तरीही सरकार त्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करत आहे. विविध मागण्यांबाबत ४ एप्रिल पासून महसूल कर्मचारी बेमुदत संपावर गेले आहेत.

राज्य महसूल कर्मचारी संघटना पदाधिकारी यांची आज दि.७ एप्रिल रोजी शासनासोबत मुंबई येथे बैठक झाली. यावेळी कोकण विभागीय समन्वय समिती सरचिटणीस विजय पुजारी, अध्यक्ष केतन भगत, सरचिटणीस भूषण पाटील, कार्याध्यक्ष गोवर्धन माने उपस्थित होते. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार शासन मागण्यांसाठी ठोस निर्णय घेण्याचा मनस्थितीत नाही असे दिसून आले आहे. त्यामुळे आमच्या मागण्यांबाबत जोपर्यंत शासन निर्णय घेत नाही, तोपर्यंत आमचे हे आंदोलन, संप सुरूच राहणार आहे असे पदाधिकारी यांनी सांगितले.

## संक्षिप्त...

### राज्यात सौर ऊर्जा पार्क उभारणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यात सौर ऊर्जा पार्क उभारण्याचा मोठा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे. महाराष्ट्रात २५०० मेगावॅट क्षमतेपर्यंत अल्ट्रामेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क उभारण्यासाठी महानिर्मिती कंपनीस एनटीपीसी लि. सोबत संयुक्त कंपनी स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेपर्यंतचे अल्ट्रामेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क विकसित करण्याकरीता नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (महानिर्मिती) यांच्या दरम्यान अनुक्रमे ५०:५० या प्रमाणात भांडवली गुंतवणूक राहील. ही संयुक्त उद्यम कंपनी राज्यात २५०० मेगावॅट क्षमतेपर्यंत अल्ट्रामेगा नवीकरणीय सौर ऊर्जा पार्क विकसित करेल. त्यासाठी राज्य शासनाच्या ऊर्जा विभागास राज्य सुकाणू अभिकरण म्हणून घोषित करण्यात आले.

या समितीवर राज्य शासनाच्या अपारंपरिक ऊर्जा धोरण-ाशी सुसंगत अशा बाबींचे पालन करण्याची जबाबदारी टाकण्यात आली आहे. सौर ऊर्जा पार्कमधील प्रकल्पधारकाकडून एक रकमी शुल्क व वार्षिक संचलन व देखभाल शुल्क इ. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अनुज्ञेय करण्यात आले आहे अपारंपरिक ऊर्जासाठी १७३६० मेगावॅट क्षमतेच्या निर्मितीचे प्रकल्प २१ मार्च २०२५ पर्यंत विकसित करण्यात येणार असून यापैकी १२९३० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प सुरु करण्याचे उद्दिष्ट आहे.

राज्यात सध्या ९३०५ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित असून २१२३ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होत आहेत.

## तळोजा रोहींजण भागातून ७ घुसखोर बांग्लादेशी नागरिकांना अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील रोहिंजण परिसरात बेकायदेशीररीत्या वास्त्यव्यास असलेल्या ७ घुसखोर बांग्लादेशी नागरिकांना तळोजा पोलिसांनी पहाटे अटक केली. यात महिला ४ महिला ३ पुरुषांचा समावेश आहे. हे सगळे बांग्लादेशी नागरिक गेल्या काही महिन्यापासून या भागात मोल-मजुरी, घरकाम करुन रहात असल्याचे तपासात आढळुन आले आहे.

तळोजा गाव फेस-१ व २, खुटारी गाव, रोहींजण गाव व इतर परिसरात बांग्लादेशी नागरीक बेकायदेशीररीत्या राहत असल्याची माहिती तळोजा पोलिसांना मिळाली होती. सदर माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक, महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक विनया पारासुर, पोलीस उपनिरीक्षक बळीराम घंटे, पोलीस उपनिरीक्षक अनंत लांब व त्यांच्या पथकाने मंगळवारी पहाटे रोहींजण परिसरात विविध ठिकाणी छापे मारले. यावेळी साई इच्छा बिल्डींगमध्ये तसेच पवन कदम व विनोद कदम यांच्या चाळीत अमिन इम्रान शेख (२३), ओहाब इसराफिल शेख (५५), नुर इस्लाम होरमुज (३५), रोजिना जैनल मुल्ला (२६), मिम्मा अमिन शेख (२०), परविन नुर इस्लाम शेख (२५), जैनल मुल्ला हमिद मुल्ला (३२), हे सात जण रहात असल्याचे आढळुन आले.

त्यामुळे पोलिसांनी या सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे प्राथमिक चौकशी केली. तसेच त्यांना भारतीय नागरिक असल्याबाबत पुरावे सादर करण्यास सांगितले. मात्र ते कोणतेही ठोस पुरावे सादर करु शकले ना-हीत. अधिक चौकशीत सगळ्यांनी बांग्लादेशी नागरिक असल्याचे स्वत: कबुल केले. तसेच त्यांनी बांग्लादेशातील गरीबीला कंटाळुन रोजगार मिळवण्यासाठी घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश केल्याचे सांगितले. या सात बांग्लादेशी नागरिकांनी वैद्य प्रवाशी कागदपत्राशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतात प्रवेश करुन तळोजा परिसरात अवैधरित्या वास्त्यव्य करित असल्याचे आढळुन आल्याने या सगळ्यांविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात पारपत्र अधिनियमानुसार, तसेच परिकय नागरी कायद्यानुसार गुन्हा दाखल करुन सगळ्यांना अटक करण्यात आली आहे.

## अलिबाग-विरार कॉरिडोर बाधीत शेतकरी संघर्ष समितीचे पनवेलचे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन

**दै.रायगड नगरी । उरण**



अलिबाग विरार कॉरिडोर बाधीत शेतकरी संघर्ष समिती उरण मार्फत उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके पनवेल व मुख्य अभियंता एम.एस.आर. डी.सी. यांना निवेदन देण्यात आले. सदर निवेदन हे अलिबाग - विरार बहुउद्देशीय मार्गासाठी होणार्या भूसंपादना बाबत उरण तालुक्यातील शेतकऱ्यांसोबत संबंधीत सक्षम अधिकार्यांच्या बैठकीचे आयोजन करण्याबाबत देण्यात आले आहे. यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष संतोष ठाकूर, खजिनदार महेश नाईक, सल्लागार वसंत मोहिते, उपाध्यक्ष रमण कासकर, उपाध्यक्ष विलास मढवी, सहसचिव नामदेव मढवी, सुनील पंडित, संजय ठाकूर, सल्लागार रामचंद्र म्हात्रे, संदेश पाटील चिर्ले, आदी उपस्थित होते.

उरण तालुक्यातील पूर्व विभागातूनअलिबाग विरार-कॉरिडोर साकारण्यात येत आहे. त्यासाठी शास-नाने शेतकऱ्यांच्या परवानगी शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी करून खूणा केल्या. परंतू या आगोदर प्रांताधिकारी यांनी शासनाच्या वतीन शेतकर्यांना या कॉरिडोर संबंधीत उरण येथे माहीतीही दिली होती. यावेळी शेतकऱ्यांनी शास-नास जमिनीचा जास्तीत जास्त मोबदला मिळावा याबाबत मागणी केली होती. या प्रकल्पात भागिदारी देण्यासंबंधी विचार मांडले होते. त्याच बरोबर नोकरी व ईतर सुविधां विषयी आपली मते मांडली होती.

त्यानंतर दि.८ फेब्रुवारी रोजी १६ गावांतील शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन देखील शासनास दिले होते. परंतू शासनाने शेतकऱ्यांच्या मागणी निवेदनावर काय चर्चा झाली.

कोणता निर्णय घेतला. किंवा या बाबत काय प्रक्रीया चालू आहे, याची माहीती मिळण्या बाबत शासनाने बैठकीचे आयोजन करून माहीती द्यावी यासाठी अलिबाग - विरार कॉरिडोर बाधीत शेतकरी संघर्ष समिती उरणने शासनास पत्र दिले आहे.

## पनवेलमध्ये शिवसेनेने केला किरीट सोमय्या यांचा निषेध ; पुतळ्याचे केले दहन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना नेते संजय राऊत यांच्या वरील ईडी कारवाईचा निषेध म्हणून आज पनवेलमध्ये शिवसेना कार्यालयाजवळ जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली ईडीचा गैरवापर करणाऱ्या किरीट सोमय्या यांचा निषेध करून त्यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.

यावेळी जिल्हाप्रमुख शिरीष घरत, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, तालुका संघटक भरत पाटील, विधानसभा संघटक दीपक निकम, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, महानगर समनव्यक गुरुनाथ पाटील, तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दीपक घरत, महिला उपजिल्हा संघटिका कल्पना पाटील, पनवेल शहर प्रमुख प्रवीण जाधव, खांदा वसाहत प्रमुख सदानंद शिर्के, कामोठे शहर प्रमुख राकेश गोवारी, नवीन पनवेल शहर प्रमख यतीन देशमुख, कळंबोली शहर प्रमुख डी.एन.मिश्रा, युवासेना उपजिल्हाधिकारी अवचित राऊत, पन-वेल विधानसभा अधिकारी पराग मोहिते, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, ॲड. जगदाळे, अपूर्वा प्रभू यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी केंद्र शासनाच्या धोरणाचा निषेध करून संजय राऊत यांच्यावर करण्यात आलेल्या ईडी कारवाईचा निषेध करून पुतळ्याचे दहन करण्यात आले.

## सोमवारी रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँन्ड सायन्स महाविद्यालयाचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ कॉमर्स अँन्ड सायन्स महाविद्यालयाचा पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ सोमवार दिनांक ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता तसेच राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान मुख्य सल्लागार डॉ. विजय जोशी यांची उपस्थिती लाभणार असून जनार्दन भगत शिक्षण संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, कार्यकारी मंडळ सदस्य व पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, सचिव डॉ. एस. टी. गडदे तसेच पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## नवी मुंबईतील पाणी पुरवठ्या संदर्भात सिडकोतर्फे महत्वाची पाऊले ; अवैध नळजोडणीवर सिडकोची नजर

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

नवी मुंबईतील पाण्याची समस्या लक्षात घेता सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली सिडको महामंडळातर्फे नवी मुंबई महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) यांच्याशी एकत्रितपणे चर्चा करून पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी नियोजन करण्यात आले.

काही दिवसांपूर्वी सिडकोतर्फे खारघर, कळंबोली, पनवेल, करंजाडे आणि तळोजा नोडमधील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी उपरोक्त प्राधिकरणांसोबत चर्चा करण्यात आली होती. नवी मुंबई महापालिकेतर्फे पूर्वनिश्चित नियोजनानुसार ५० एमएलडी पाण्याचा पुरवठा करणे आवश्यक होते. परंतु प्रत्यक्षात करण्यात येणारा ४३ एमएलडी पाण्याचा पुरवठा करण्यात येत होता. परंतु काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आल्यानुसार एनएमएमसीतर्फे ५० एमएलडी पाण्याचा पुरवठा सुरळीतपणे करण्यात येत असल्याने खारघरमधील बहुतांशी परिसरातील पाणी पुरवठा

> पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याबरोबरच या उपाययोजनांचा नियमितपणे आढावाही सिडकोकडून घेण्यात येत आहे. तसेच अवैध नळ जोडणी रोखण्यासाठी मोहिम सुरू करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.
>
> **डॉ. संजय मुखर्जी,**
> **उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको**

.../२

# ‘अंगारमळ्या’चे भग्नावशेष

‘स्वाभिमानी शेतकरी संघटने’चे लढाऊ नेते आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी महाराष्ट्रातील सत्ताधारी महाविकास आघाडीतून फारकत घेतली आहे. तशी चिन्हे दिसतच होती. ते नक्की बाहेर जात आहेत म्हटल्यानंतर, ‘आमच्या आघाडीतून कोणीही जाऊ नये, आम्ही सर्वांनी एकत्र राहायला हवे,’ असे म्हणून स्वत:च्या छातीवर नवी औदार्यपदके काही नेत्यांनी लावून घेतलीच. राज्यात हे सरकार आले, तेव्हा राजू शेट्टी आघाडीसोबत गेले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेत गंभीर मतभेद होऊन आधीच फूट पडली होती. राजू शेट्टी यांचे एकेकाळचे घनिष्ठ सहकारी सदाभाऊ खोत भारतीय जनता पक्षाबरोबर गेले आणि यापूर्वीच्या भाजप-शिवसेना मंत्रिमंडळात मंत्री झाले. आता आघाडी सरकारमध्येही स्वाभिमानी शेतकरी संघटनेला मंत्रिपद मिळू शकले असते; पण संघटनेचे एकमेव आमदार देवेंद्र भुयार शेवटपर्यंत मंत्री होऊ शकले नाहीत. शेवटी त्यांनी संघटना सोडली. संघटनेनेही त्यांना काढून टाकले. याच काळात विधान परिषदेवर राज्यपाल नियुक्त आमदारांच्या प्रस्तावित यादीत राजू शेट्टी यांचेही नाव होते, असे सांगण्यात येते. एकदा विधान परिषदेवर आल्यावर राजू शेट्टी यांना मंत्रिपद मिळू शकलेही असते; मात्र राज्यपालांनी आजतागायत ही यादीच मंजूर केलेली नाही. आता शेट्टी स्वत:च राज्यपालांना भेटून, ‘आपले नाव यादीत असेल तर काढून टाका,’ अशी विनंती करणार आहेत. या साऱ्या राजकारणाचा धांडोळा घेतल्यास यात शेतकऱ्यांच्या हिताचा, त्यांच्यावरच्या अन्यायाचा किंवा समस्यांचा काय संबंध येतो, असाच प्रश्न कुणालाही पडेल. राज्यातील सर्वच शेतकरी संघटना आणि त्यांचे नेते राजकीय पक्षांच्या वळचणीला जाऊन बसले असून, आपली मूळ ताकद व आवाज हरवून बसले आहेत. अर्थात, हे दुखणे आजचे नाही. ‘शेतकऱ्यांचे पंचप्राण’ असे ज्यांचे सार्थ वर्णन व्हायचे, ते दिवंगत शरद जोशी यांच्या काळापासूनच एका बाजूला फाटाफूट आणि दुसरीकडे राजकारणातली फरफट, असे दुहेरी दुर्दैव शेतकरी संघटनेच्या मागे लागले आहे. एके काळी, ‘मते मागायला तुमच्या दारात आलो, तर जोड्याने मारा,’ असे जाहीरपणे म्हणणाऱ्या शरद जोशी यांच्या सार्वजनिक जीवनाचा समारोप भाजपच्या कृपेने मिळालेल्या राज्यसभेच्या खासदारकीने झाला होता; मात्र शरद जोशी हे द्रष्टे आणि शेतकऱ्यांच्या हितावर नितांत निष्ठा असणारे नेते असले, तरी त्यांना आपल्या संघटनेतील फूट रोखता आली नाही. राजू शेट्टी आघाडीतून बाहेर पडताना, शेतकऱ्यांच्या अनेक मागण्यांचा उल्लेख करीत आहेत. किमान समान कार्यक्रम आघाडी राबवत नाही, असेही ते म्हणतात. हे कळायला त्यांच्यासारख्या चाणाक्ष नेत्याला अडीच वर्षे का लागावीत, असाच प्रश्न कुणालाही पडेल. कालपर्यंत शेट्टी भाजपला लाखोली वाहत होते. आता मात्र त्यांच्या स्वागतासाठी पायघड्या अंथरण्यासाठी त्या पक्षातील नेते पुढे सरसावत आहेत. महाविकास आघाडीला ‘स्वाभिमानी’चे नैतिक अधिष्ठान हवे होते, असे शेट्टी आता म्हणत आहेत; मात्र राज्यातील शेतकरी नेते इतके राजकारणग्रस्त झाले आहेत, की त्यांच्या घसरत्या नैतिक अधिष्ठानाची काळजीच वाटावी. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशाच्या पातळीवरही ‘शेतकऱ्यांचा आवाज तुम्हाला ऐकावा लागेल आणि मनमानी करता येणार नाही,’ असा सत्ताधाऱ्यांना सज्जड इशारा देण्याचे काम शरद जोशी यांनी केले होते. त्यामागे, संघटनेची बांधणी आणि नवा अर्थविचार, असे दोन्ही होते. शरद जोशी यांचा वारसा सांगणाऱ्या किंवा नाकारणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या शेतकरी संघटना आज महाराष्ट्रातला आपला सगळा प्रभाव हरवून बसल्या आहेत. यात खरे नुकसान शेतकऱ्यांचे होते आहे. आज दुधाचा व्यवसाय किफायतीचा राहिलेला नाही. सहकारी साखर कडू झाली आहे. आत्महत्या थांबायला तयार नाहीत. बाजार समित्यांच्या बेड्या निघालेल्या नाहीत. दुष्काळमुक्ती झालेली नाही. कांदा, द्राक्षे, केळी, कापूस पिकवणारे घोर संकटात आहेत. अतर्क्य हवामानबदल व पाऊसमान शेतकऱ्याच्या जिवावर उठले आहे. अशा वेळी, कुणीही सत्तेवर असले, तरी त्यांना एकजूट शेतकऱ्यांनी धारेवर धरले पाहिजे. सहकारातली बेबंदशाही मोडून काढण्यासाठी कंबर कसली पाहिजे. प्रत्यक्षात सत्तेच्या चार तुकड्यांसाठी राज्यातले अनेक शेतकरी नेते आणि शेतकऱ्यांच्या अनेक संघटना लाळघोटेपणा करीत आहेत. नादान राजकीय पक्षांच्या नादाला लागून शेतकऱ्यांची वंचना करीत आहेत. या किंवा त्या आघाडीचा किमान कार्यक्रम मागण्याऐवजी, राज्यातील सगळ्या शेतकरी संघटनांनीच आपला किमान कार्यक्रम बनवून एकजुटीची मूठ आवळली, तर शेतकरी व शेतमजुरांचे थोडे तरी हित होईल. नेत्यांना लागलेली अहंकाराची कीड आणि सत्तेची हाव त्यासाठी दूर करावी लागेल. शरद जोशी यांनी एके काळी महाराष्ट्रात ‘अंगारमळा’ फुलवला होता. त्या अंगारमळ्याचे भग्नावशेष आज इतस्तत: विखरून पडत आहेत. गावोगावचा योद्धा शेतकरी त्याकडे विमनस्क मनाने आणि शून्य नजरेने केवळ पाहत आहे.

# डोके जमीनीवर आपटुन ३ वर्षीय मुलीची हत्या करणारा आरएएफचा जवान अटकेत

## पत्नीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातून मुलीची हत्या केल्याचे उघड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा येथील रॅपीड ॲक्शन फोर्समधील एका जवानाने कौटुंबिक वादातुन पत्नीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातुन आपल्या ३ वर्षीय मुलीला डोक्यावर आपटुन, तिच्या पोटामध्ये ठोसे मारुन तिची हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या नराधम पिता इतक्यावरच थांबला नाही, तर त्याने आपल्या मुलीचा मृतदेह लुंगीत गुंडाळून डेब्रीजमध्ये टाकुन तिच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा देखील प्रयत्न केल्याचे उघडकीस आले आहे. परशुराम तिपन्ना (३९) असे या आरएएफ जवानाचे नाव असून खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात हत्या व पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

या घटनेतील अटक आरोपी परशुराम तिपन्ना हा मुळचा कर्नाटक राज्यातील असून तो तळोजा येथील रॅपीड ॲक्शन फोर्समध्ये कार्यरत आहे. तसेच तो खारघर मधील पापडीचा पाडा गाव येथील चैतन्य सोसायटीत दुसरी पत्नी भाग्यश्री व ३ वर्षीय मुलगी मिनाक्षी यांच्यासोबत राहण्यास होता.

परशुराम याची पहिली पत्नी गावी असल्याने त्याचे दुसरी पत्नी भाग्यश्री हिच्यासोबत नेहमी कौटुंबिक वादातुन भांडण होत होते. सोमवारी मध्यरात्री १ वाजण्याच्या सुमारास परशुरामचे पत्नीं भाग्यश्रीसोबत कडाक्याचे भांडण झाले. या भांडणाच्या रागात आरोपी परशुराम याने पत्नी भाग्यश्री हिला बेदम मारहाण केली. तसेच त्याने रागाच्या भरात आपली ३ वर्षीय मुलगी मिनाक्षी हिला डोक्यावर आपटुन तिच्या पोटात ठोशा बुक्क्याने मारले.

त्यामुळे मुलगी मिनाक्षी मृत झाल्यानंतर हत्येचा हा प्रकार उघडकीस येऊ नये यासाठी आरोपी परशुराम याने आपल्या मुलीचा मृतदेह एका लुंगीत गुंडाळून तळोजा गावाजवळच्या मोकळ्या मैदानात डेब्रिजमध्ये टाकुन त्यावर माती टाकुन पुराव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी काही नागरिकांना लहान मुलीचा मृतदेह निदर्शनास आल्यानंतर त्यांनी याबाबतची माहिती खारघर पोलिसांना दिली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक शिरीष यादव यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेऊन मुलीचा मृतदेह ताब्यात घेतला. तसेच सदरचा मृतदेह पनवेल येथील उप जिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवुन दिला. त्यानंतर पोलिसांनी हत्या करण्यात आलेल्या मुलीची ओळख पटविण्यासाठी पापडीचा पाडा गावात शोधा-शोध सुरु केली असता, मृत मुलगी ही चैतन्य सोसायटीतील रॅपीड ॲक्शन फोर्समधील जवानाची मुलगी असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

त्यानुसार पोलिसांचे पथक सदर इमारतीजवळ गेले असताना, आरोपी परशुराम तिपन्ना हा रॅपीड ॲक्शन फोर्सच्या गणवेशात पळून जात असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आला. त्यामुळे पोलिसांनी पाठलाग करुन त्याला पकडुन त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने प्रथम उडवा उडवीची उत्तरे दिली. मात्र पोलिसांनी त्याला विश्वासात घेऊन त्याची अधिक चौकशी केली असता, पत्नीसोबत झालेल्या भांडणाच्या रागातुन त्याने मुलीची डोके आपटुन तिची हत्या केल्याचे तसेच तिच्या मृतदहाची विल्हेवाट लावण्यासाठी तिचा मृतदेह लुंगीत गुंडाळुन तो डेब्रिजमध्ये टाकुन दिल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

# आपत्ती व्यवस्थापन प्रत्येकाला आले पाहिजे : सुरेंद्र म्हात्रे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

घरातील प्रत्येकाला आपत्ती व्यवस्थापन ची माहिती असली पाहिजे,कारण आपल्या कडे २ वेळा चक्रीवादळ चा अनुभव घेतला असल्याने आपत्ती आल्यास नेमके काय करावे व काय करू नये हे माहीत असणे गरजेचे असल्याने रायगड भूषण जयपाल पाटील यांनी २ वेळा जागतिक आपत्ती परिषदेत अभ्यास केल्याने त्याचा लाभ रायगड जिल्हा परिषदेने घेण्यासाठी ८०४ ग्रामपंचायत मध्ये शिबिराचे नियोजन केले आहे,या चोल ग्रामपंचायतीत असलेल्या कार्यक्रम उद्घाटक म्हणून त्याचे विचार ऐकण्याची संधी प्राप्त झाली आहे असे प्रतिपादन सुरेंद्र म्हात्रे यांनी केले.

व्यासपिठावर कार्यक्रम अध्यक्ष सरपंच स.प्रतिभा पवार,रायगड भूषण जयपाल पाटील,ग्रामविकास अधिकारी सुनील महाजन उपस्थित होते. प्रारंभी छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पुतळ्याचे पूजन व पुष्पहार अर्पण केला,पाहुण्याचे स्वागत सरपंच व उपसरपंच यांनी फुले देऊन केले. सुरवातीला सुहास गानू यांनी योगाबद्दल माहिति व प्रात्यक्षिक केले.


मा.मुजावर साहेब कोर्ट

**ॲड.प्रमिला मो. ठाकूर**

**जाहीर नोटीस**

मे.पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश सो., यांच्या कोर्टा समोर

सी.एम.ऐ.नं.१४२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०६/२०२२

**सौ.चांदनी जगदिपसिंग ठाकूर वगैरे** — अर्जदार

विरुद्ध

**मनोज अमरचंद पाटील** — सा.वाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ **सौ.चांदनी जगदिपसिंग ठाकूर** अर्जदार नं.२ **सौ.विद्या दत्तात्रेय थळे** अर्जदार नं.३ **पुजा कुमार फणसेकर** व सा.वाला **मनोज अमरचंद पाटील** यांचे वडील **कै.अमरचंद हासू पाटील** हे दि.१९/०७/२०१८ रोजी मयत झाले असून आई **कै.प्रमोदिनी अमरचंद पाटील** या दि.०६/०८/२०२० रोजी पनवेल येथे मयत झाले आाहेत. त्यांचा दाखल अर्जासोबत जोडला आहे. तसेच मयत **कै.अमरचंद हासू पाटील** व **कै.प्रमोदिनी अमरचंद पाटील** यांचा मुलगा **कै.संजय अमरचंद पाटील** हे दि.२०/०५/२०१४ रोजी पनवेल येथे मयत झालेले आहे. त्यांना अर्जदार क्र.४ पत्नी **गितांजली संजय पाटील** अर्जदार क्र.५ मुलगी-**कु.शाल्मली संजय पाटील** व मुलगा **कु.ईश्वर संजय पाटील** हे कायदेशीर वारस आहेत.

**कै.अमरचंद हासू पाटील** हे दि.१९/०७/२०१८ रोजी मयत झाले असून आई **कै.प्रमोदिनी अमरचंद पाटील** या दि.०६/०८/२०२० रोजी पनवेल येथ मयत झाले आहेत. यांच्या मृत्यूनंतर यांच्या नावाने खालील मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन : ब्लॉक नं.बी/१९, तळमजला,**
**श्री गणेश कृपा को. हौसिंग सोसायटी, पनवेल, रायगड**

सदरील वारस दाखला मधील मिळकती संदर्भात अन्य कोणाच्या नावाने मृत्यूपत्रानं, खरेदीखताने, हक्कसोडपत्राने, बक्षिसपत्राने, गहाण अथवा इतर कोणत्याही वारसांची कसलीही हरकत असल्यास सदरील जाहिरानामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत मे.पनवेल कोर्टात हरकत नोंदवावी.

वरील मुदतीमध्ये ३० दिवसात हरकत आली नाही तर सदरील मिळकतींना अर्जदार हे कायदेशीर वारस आहेत असे वारस दाखला त्यांना देण्यात येईल. तसेच मागाहून येणाऱ्या हरकतींचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.०४/०४/२०२२

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



**प्रोसेस जमा ता.१००/-**

**ॲड.केदार नि. सोमण**
**अर्जदारांचे वकील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.२४२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०४/२०२२

**१) श्री.मिलींद यशवंत जोगळेकर**
वय : ५५ वर्षे, धंदा : नोकरी

**२) श्री.यशवंत महादेव जोगळेकर**
वय : ८४ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.बी.४०१, राधा हरी निवास,
टिळक रोड, पनवेल ४१०२०६

**३) सौ.अरुंधती अल्हाद महाजन**
वय : ५० वर्षे, धंदा : नोकरी
रा.४, पंकज सोसायटी, सहकारी कॉलनी
ठाणे (प) ४००६०२ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै. उज्वला यशवंत जोगळेकर** यांचे निधन मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे दि.१२/०४/२०२० रोजी मयत झाल्याने **कै.उज्वला यशवंत जोगळेकर** यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील महानगरपालिका यांचे हद्दीतील सिटी सर्व्हे क्र.६०६ ब, ६०७, ६०८, ६१०, २८५ वर स्थित ‘राधा हरी निवास’ को.ऑप.हौ.सोायटीमधील ‘बी’ विंग चौथा मजला येथील फ्लॅट नं.४०१ क्षेत्र ४३७ चौरस फूट कारपेट अशा वर्णनाची वडिलोपार्जित निवासी सदनिका**

वर **श्री.मिलींद यशवंत जोगळेकर वगैरे** हे **कै.उज्वला यशवंत जोगळेकर** यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट **श्री.मिलींद यशवंत जोगळेकर वगैरे** यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर **कै.उज्वला यशवंत जोगळेकर** यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०५/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**


# ग्रामस्थांचे पाली पंचायत समिती कार्यालयासमोर रिकामे हंडे घेऊन तीव्र आंदोलन व उपोषण

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



सुधागड तालुक्यातील दहीगाव बौद्धवाडी येथे पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी तालुका वंचित बहुजन आघाडीतर्फे गटविकास अधिकारी विजय यादव यांना निवेदन देण्यात आले होते. मात्र येथील पाणी प्रश्न सुटला नसल्याने गुरुवारी (ता.७) वंचित बहुजन आघाडी पदाधिकारी व महिला आणि ग्रामस्थांनी रिकामे हंडे घेऊन पाली पंचायत समिती कार्यालयासमोर रिकामे हंडे घेऊन तीव्र आंदोलन केले. तसेच ग्रामस्थ रवी लोखंडे हे उपोषणास बसले होते.

यावेळी प्रशासना विरोधात जोरदार घोषणाबाजी देखील देण्यात आली. दहिगाव बौद्धवाडी येथील ग्रामस्थ मागील दोन वर्षांपासून पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत ग्रामपंचायत कार्यालयाशी संपर्क करीत आहेत. मात्र ग्रामपंचायत ग्रामस्थांच्या पाणी प्रश्नावर गांभीर्याने विचार न करता केवळ उडवाउडवीची उत्तरे देत आहे. आणि हा विषय टाळत आहे. त्यामुळे या ग्रामस्थांचे पिण्याच्या पाण्यासाठी देखील हाल होत असून याकरिता त्यांना कोणाकडून तरी मागून पाणी आणावे लागत आहे. तसेच शासनाने १५ वित्त आयोगातून पाणीपुरवठा करिता मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध केलेला असतांना केवळ हा समाज बौद्ध व मागास असल्याकारणाने त्यांची पाणीपुरवठा योजना लांबणीवर टाकली जात असल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड यांनी यावेळी केला.

आंदोलनावेळी वंचित बहुजन आघाडी सुधागड तालुका अध्यक्ष अमित गायकवाड महासचिव आनंद जाधव, युवा अध्यक्ष राहुल गायकवाड, युवा महासचिव प्रशांत गायकवाड, मयूर गायकवाड, अनिकेत लोखंडे यासह नेते मंगेश वाघमारे, प्रमोद कदम, स्वप्नील गायकवाड, सचिन गायकवाड, रूपेश कदम व भागवत गायकवाड आदी पदाधिकारी महिला व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी गटविकास अधिकारी विजय यादव, तहसीलदार दिलीप रायण्णावार, पंचायत समिती कृषी अधिकारी अशोक महामुनी आदी अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन चर्चा केली व यावर मार्ग काढला जाईल असे सांगितले. मात्र आंदोलनकर्त्यांचे समाधान न झाल्याने ते आपल्या मागण्यांवर ठाम होते. ठोस व लेखी आश्वासन दिल्याशिवाय मागे हटणार नाही असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

# अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुक्यातील महादेववाडी--कोलाड येथे अखंड हरिनाम सप्ताह व श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पारायण आदी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन रवि.दि.१० एप्रिल ते बुध.दि.१३ एप्रिल या कालावधीत करण्यात आले आहे.

वै.गुरूवर्य अलिबागकर बाबा, गोपाळबाबा वाजे धोंडूबाबा कोलाटकर, सिताराम दाजी खामकर व श्रीधर महाराज बाईत यांच्या कृपाशिर्वादाने तसेच ह.भ.प.नारायणदादा वाजे (मठाधिपती पंढरपूर) यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या सप्ताह सोहळ्यात दररोज पहाटे ४ ते ६ या वेळेत काकडआरती, सकाळी ८:३० ते १२:३० व सायं. ३ ते ५ या वेळेत ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे सामुदायिक पारायण, सायं.५:३० ते ६:३० या वेळेत ज्ञानेश्वरीवरील प्रवचने,६:३० ते ७:३० वा.पर्यंत हरिपाठ, रात्रौ.९ ते १२ हरिकिर्तनरुपी सेवा तद्नंतर हरिजागर आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. तर या सप्ताह प्रसंगी दररोज हरिकिर्तनरुपी सेवेचे आयोजन करण्यात आले आहे.

# युनिफाइड आर्ट्स अँड क्राफ्ट इव्हेंट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राष्ट्रीय बौद्धिक सशक्तिकरण संस्था, नवी मुंबई संस्थेकडून जागतिक स्वमग्न दिवस साजरा केला जात आहे. स्वमग्न जागरूकता सप्ताहाचा एक भाग म्हणून, राष्ट्रीय बौद्धिक सशक्तिकरण संस्था, नवी मुंबई द्वारे युनिफाइड आर्ट्स अँड क्राफ्ट इव्हेंट आयोजित केला होता. बौद्धिक आणि विकासात्मक दिव्यांग (दिव्यांगजन) मुलांनी त्यांच्या पालकांसह सहभाग घेतला. यावेळी मोठ्या संख्येने विशेष मुले, पालक, प्रशिक्षणार्थी, संस्थेचे कर्मचारी यांनी सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे व्याख्यता ज्योती खरात, डी. सावंत, विशेष शिक्षक शर्मिश्ठा घोष, गायत्री कवडे, सुरेश बेडके,संतोष शेलार यांनी केले. संपुर्ण कार्यक्रम डॉ रवी प्रकाश सिंह संस्थेचे प्रभारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.


**म्हसळा नगर पंचायत, म्हसळा**

**जाहीर नोटीस**

**जा.क्र.म्हनपं/जाहीर नोटीस/ ४९ / २०२२ दिनांक :- ०७/०४/२०२२**

महाराष्ट्र नगर परिषदा, म्हसळा नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणासंबंधाने म्हसळा नगरपंचायतीस प्राप्त झालेल्या मालमत्ताधारकांच्याप्रकरणपरत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत हितसंबधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह म्हसळा नगर पंचायतीकडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा कर वसुलीच्या सोईसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपंचायत दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्रं | अनुसूची | अनुसूची पुस्तकातील क्रमांक / मालमत्ता क्रमाक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १२४ पैकी | साळीवाडा | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला गाळा नं. १ | रमेश मिश्रीमल जैन प्रिती रमेश जैन | रुपेश दशरथ महाडिक |
| २ | २ | १८६६ पैकी | नवानगर | आसमा अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत स्टील पहिला मजला फ्लॅट नं. १०४ | अशफाक सादुल्ला खमकर अब्दुल सलाम हुसेन हुर्जुक | अरीफ मजीद बावानी |
| ३ | २ | १८६६ पैकी | नवानगर | आसमा अपार्टमेंट आर. सी. सी. पद्धतीत स्टील दुसरा मजला A विंग फ्लॅट नं. २०१ | अशफाक सादुल्ला खमकर अब्दुल सलाम हुसेन हुर्जुक | मुबीन हारून मेमन |
| ४ | २ | १७७३ पैकी | काझी मोहल्ला | हुजेफा मंझील आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली निवासी इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०४ | इब्राहीम अल्लीमिया दोंदिलकर मुनिरा इब्राहीम दोंदिलकर | मुनिरा इब्राहीम दोंदिलकर |
| ५ | २ | २०१८ पैकी | नवानगर | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत पहिला मजला फ्लॅट नं. १०१ | अरफात मुखतार जंजीरकर | फरहत सलीम शेख |
| ६ | २ | १२११ पैकी | नवानगर | आयशा रेजीडेन्सी आर. सी. सी. पद्धतीत इमारत दुसरा मजला फ्लॅट नं. २०१ | शाहिद महमद अल्ली सरखोत | रफिक हारून मेमन |
| ७ | २ | १८५४ पैकी | साईनाथ आळी | आर. सी. सी. पद्धतीत बांधलेली इमारत तळ मजला फ्लॅट नं. १ अंडर ग्राउंड | रणजीत मिश्रीमल जैन | उमेश धिनू चव्हाण |
| ८ | ३ | ५८९ | सावर गौळवाडी | कौलारू चिखल मातीत बांधलेले घर | भिकू सखाराम दिवेकर | सखाराम भिकू दिवेकर सरस्वती गणपत खेडेकर दर्शना दत्तात्रेय वडेकर |
| ९ | ३ | ३०६ | सानेआळी | कौलारू चिखल मातीत बांधलेले घर | शरीफा मोहम्मद साईद कुर्बानशहा | शाहीन म.सईद कुर्बानशहा सुफीयान रिजवान कुर्बानशहा फरहान रिजवान कुर्बानशहा जिबरान रिजवान कुर्बानशहा सलमान रिजवान कुर्बानशहा कु.जिबरान व कु. सलमान यांचे वतीने निष्पादनासाठी अ.पा.क.आई तबस्सुम रिजवान कुर्बानशहा |

सही/- XXX
मुख्याधिकारी
म्हसळा नगरपंचायत


पृष्ठ क्र.१ वरुन...

## ८ जणांच्या टोळीस ८९ एटीएम कार्डसह अटक

असताना अशा प्रकारची गुन्हे करणारी बिहार राज्यातील एक टोळी सकीय असल्याबाबत खात्री झाली. ही टोळी बिहार राज्यातून काही कालावधीसाठी मुंबईत येवून गुन्हे करुन परत बिहार येथे निघून जात असलेबाबत आढळून आले. त्यांच्यावर निगराणी ठेवली असता, सदरची टोळी अशा प्रकारचे गुन्हे करुन मोठया प्रमाणात रक्कम लुटून पसार होण्यासाठी पनवेल शहर येथील काही एटीएम सेंटरवर दरोडा टाकणार असल्याबाबत खात्रीशीर माहिती गुन्हे शाखा, कक्ष २ ला माहिती प्राप्त झाली. त्यानुसार सदर ०८ इसमांची टोळी कर्नाळा स्पोर्टस लगतच्या परिसरात एटीएम सेंटरवर दरोडा टाकण्याकरीता दरोड्याची तयारी करत असताना घातक शस्त्रासह मिळून आली. त्यांचेविरुध्द पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १६४/२०२२ भा.द.वि. कलम ३९९, ४०२ भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. एकुण ०८ लोकांकडे घातक शस्त्रासह वेगवेगळया बँकाचे एकुण ८९ एटीएम कार्डस मिळून आले आहेत. अटक आरोपीकडुन गुन्हे शाखा कक्ष २ यांनी एटीएम कार्ड एक्सेंज करुन फसवणूकीचे एकुण १२ गुन्हे उघडकीस आणले आहेत. अजूनही अशा प्रकारचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

## नवी मुंबईतील पाणी पुरवठ्या संदर्भात सिडकोतर्फे महत्वाची पाऊले

संतुलित झाला आहे. त्याचबरोबर लघुकालीन उपाययोजनांमध्ये खारघरमधील पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी सेक्टर-१८, येथे बसविण्यात आलेला २० लाख लीटरचा जलकुंभ (ईएसआर) येत्या ८ दिवसांत कार्यान्वित होणार आहे. उलवे येथील सेक्टर-१६ व १७ मधील जलवाहिन्यांचे काम येत्या ८ दिवसांत पूर्ण होणार आहे. त्याचबरोबर तळोजा नोड येथे उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या भूमिगत जलकुंभाबाबतचा (जीएसआर) अहवाल येत्या २ दिवसांत तयार होणार आहे. तळोजा नोडला अधिक वॉटर टँकरचा पुरवठा करण्यात येणार असून हेटवणे पाणी पुरवठा योजनेतील पाण्याच्या दाबावर देखरेख ठेवण्यात येणार आहे. खारघरनजीकच्या गावांचे सर्वेक्षण करून तेथील पाणी पुरवठ्याच्या परिस्थितीचा अहवाल तयार करण्यात येणार आहे. तसेच उपरोक्त नोडमधील पाणी चोरी व पाण्याचा अपव्यय या घटना टाळण्यासाठी अधिकाऱ्यांतर्फे रात्रीच्या वेळी अचानक भेटी देण्यात येणार आहे.

दर रविवारी टाटा पॉवर कंपनीकडून जल विद्युत निर्मिती बंद होत असल्यामुळे मजिप्राच्या पाताळगंगा जल केंद्रातून उपसा करणे अशक्य होत असल्याने कळंबोली, पनवेल, करंजाडे परिसरातील पाणी पुरवठ्यावर परिणाम होत आहे. याकरिता टाटा पॉवर कंपनीला दर रविवारी जरी जल विद्युत निर्मिती बंद ठेवली तरी पाणी नेहमीसारखे पाताळगगा नदीत सोडण्याची विनंती करणारे पत्र पाठवण्यात येणार आहे. सिडकोतर्फे करण्यात येत असलेल्या लघुकालीन व दिर्घकालीन उपाययोजना, सर्व संबंधित प्राधिकरणांचे सहकार्य व अवैध नळ जोडणीविरोधातील मोहिम यांमुळे पाणी पुरवठ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी मदत होणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विद्यार्थ्यांना कोरोना लसिकरण मोहिम संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खाब़ या शिक्षण संस्थेच्या श्रमिक विद्यालय चिल्हे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आंबेवाडी मार्फत १२ वर्षावरील विद्यार्थ्यांना कोरोनो लसिकरण मोहीम यशस्वीपणे संपन्न करण्यात आली.

यावेळी मुख्याध्यापक दिपक जगताप, सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते. आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी आम्रपाली घाडगे, आरोग्य सहाय्यक रमेश हंबीर, आशा गटप्रवर्तक प्रतिभा पोटफोडे, आशा सेविका त्रुप्ती महाडिक, सायली मरवडे, स्वाती ठाकूर यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबविली.

शेवटी तिसे शाळेतील उपक्रमशिल शिक्षिका सौ.अनिता ढाकणे मॅंडम यांनी सर्वाचे आभार मानून या लसिकरण मोहिमेची सांगता करण्यात आली. दरम्यान आंबेवाडी प्रा.आरोग्य केंद्राचे वतीने विद्यार्थी वर्गाच्या आरोग्याच्या द्रुष्टीने राबविण्यात आलेल्या या मोहिमेबद्दल मुख्याध्यापक दिपक जगताप यांनी विद्यालय व संस्थेच्या वतीने आरोग्य केंद्राचे जाहिररित्या आभार व्यक्त केले.

## बाळसई येथे श्री. बेलजाई मातेचा पालखी सोहळा उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्याजवळील बाळसई येथे श्री.बेलजाई मातेचा पालखी सोहळा तिथिनुसार बुधवारी (दि.६) अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. गेल्या दोन वर्षांमध्ये जगावर कोरोनाचे सावट असल्यामुळे हा पालखी सोहळा रद्द करण्यात आला होता. परंतु यावर्षी मात्र पुन्हा त्याच उत्साहात बेलजाई मातेचा पालखी सोहळा पार पडला.

या कार्यक्रमाची सुरुवात सर्व बाळसई ग्रामस्थांच्या उपस्थितीत तसेच पाली येथिल पुरोहित गद्रे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी होमहवन, मुर्तीवर अभिषेक तसेच श्री.बेलजाई मातेची पुजा करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास संपुर्ण बाळसई गाव-ातुन ढोल-ताशांच्या गजरात पालखीतून भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी गावात सर्वत्र आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. पालखी सोहळ्याच्यावेळी महिलावर्ग तसेच तरुणांनी नाचण्याचा मनसोक्त आनंद लुटला. या सोहळ्यासाठी नोकरी-व्यवसायानिमित्त मुंबई, ठाणे व इतरत्र असलेले बाळसईतील चाकरमानी, नागरीक तसेच माहेरवाशिणी आवर्जून उपस्थित राहिल्या होत्ता. हा भक्तिमय मिरवणूक सोहळा रात्री ८.३० वाजता मंदिरात पोहचल्यानंतर या सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या सर्वांना गावातील तरुण महेश तेंलगे यांच्यातर्फे महाप्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. हा भव्य पालखी सोहळा पार पडण्यासाठी बाळसई गावचे अध्यक्ष मधुकर ठमके यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ, बेलजाई मित्र मंडळ, तसेच मुंबई मंडळ यांनी सहकार्य केले.




### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# श्रीवर्धनमध्ये लोडशेडिंगच्या झटक्याने संतापाचा भडका

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये महावितरण कडून कुठलीही पूर्वसूचना न देता विद्युत पुरवठा खंडित झाल्याने दिवसभर उन्हाच्या झळाणी हैराण झालेल्या येथील रहिवाशांचा बुधवारी रात्री अकरा वाजताच्या लोडशेडिंगमुळे संतापाचा पारा चढला आहे. मात्र, वीज वितरण कंपनीकडे याची कोणतीही माहिती नसल्याने येथील नागरिक मोठया पेचात अडकला आहे.

बोर्लीपंचतन विभागातील महावितरणचे गोंडघर सबस्टेशन असून दिघी, कुडगाव, नानवली, आदगाव, वेळास, वडवली, शिस्ते, दिवेआगर तसेच बोर्लीपंचतन अशा प्रमुख गावांसह वीस ते पंचवीस वाड्यांचा विद्युत पुरवठा येथूनच सुरू आहे. मात्र, मागील दोन दिवसात येथील विद्युत सप्लाय अचानक बंद होत असल्याने दिवेआगर, वडवली अशा दुय्यम अभियंता कार्यालयातील



अधिकाऱ्यांना विचारले असता आम्हाला याची माहिती नसल्याचे सांगण्यात येत असल्याने महावितरणाच्या विरोधात संताप व्यक्त करण्यात येत आहे.

महावितरणने बुधवारी तालुक्यातील अर्ध्यापेक्षा अधिक भागांत अचानक दोन तासांपर्यंत लोडशेडिंग केले. ज्या भागात अधिक विजेची गरज आहे. अशा भागांत लोडशेडिंग करण्यात येत आहे.

या अचानक उद्भवलेल्या परिस्थितीने महावितरणच्या विरोधात संताप व्यक्त झाल्याने अनेक नागरिकांनी शहरातील महावितरणच्या कार्यालयात फोन करून आपला संताप व्यक्त केला. अधिकाऱ्यांचे फोन खणखणत होते. मात्र, अभियंत्यांनी अक्षरश: याकडे दुर्लक्ष केले.

बोर्लीपंचतन परिसरातील गावांतील दररोज रात्रीच्या वेळी दोन तास लोडशेडिंग सुरू आहे. याची कल्पना देखील येथील महावितरणच्या वरिष्ठांना नाही. त्यामुळे येथील नागरिकांना मोठा प्रश्न भेडसावत आहे. लोडशेडिंगच्या समस्येबद्दल जाब विचारण्यात आला. मात्र, कोणतीही माहिती नसणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांची उत्तर देताना चांगलीच दमछाक झाली.

# गुरे चोरणारी टोळी सक्रिय ; पोलिसांनी तपास करून गुन्हेगारास अटक करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यात शहर परिसरातील गेल्या दहा पंधरा दिवसात किमान २० ते २५ गुरांची चोरी झाली आहे. गुरे चोरणाऱ्या टोळीला अटकाव करण्यात पोलिसांना अपयश येत असल्यामुळे शेतकरी धास्तावले आहेत.तळा शहर लगत असलेल्या वडाची वाडी येथील शेतकरी हीनु जानू पवार यांनी त्यांची ३ गुरे अज्ञात चोरट्यांनी ५ एप्रिल २२ रोजी चोरून नेल्याची फिर्याद तळा पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली आहे.

सदर निवेदनानुसार, पवार हे वडाची वाडी येथील रहिवासी असून शेतीचा व्यवसाय करतात.त्यांच्या मालकीची ३ जनावरे ५ एप्रिल २२ रोजी शेतातून अज्ञात इसमांनी चोरून नेली असल्याचा आरोप निवेदनामधून केला आहे.पवार यांनी नेहमी प्रमाणे गुरे चरायला आणि पाणी पिण्यासाठी शेतात सोडत असतात परंतु पुन्हा त्यांना आणायला गेले असता ती गुरे तिथे नव्हती त्यामुळे सदर गुरे चोरी करण्यात आली. याप्रमाणेच अनेक शेतकर्यानेदेखील त्यांची काही जनावरे चोरुन नेल्याची तोंडी तक्रार पोलीस स्टेशनमध्ये दाखल केली आहे.

करोना संक्रमणाच्या काळापासून शासनाने घातलेल्या निर्बंधांमुळे शेतकऱ्यांचे त्यांच्या शेतजमिनी व बागायतीच्या ठिकाणी वावर कमी झाला होता. तसेच आर्थिक विवंचनेत सापडलेल्या अनके शेतकऱ्यानी आपली गुरे मोकळी सोडली होती. वडाची वाडी, राणेचीवाडी, बामणघर ,तारणे, रोहिदास अळी, पुसाटी या भागात अनेक ठिकाणी दुग्ध व्यवसाय केला जातो. गुरे चोरीच्या प्रकारामुळे दुग्ध व्यावसायिकांनीही चिंता व्यक्त केली आहे. गुरे चोरी होत असली तरी त्याची तक्रार करणाऱ्यांची संख्या कमी आहे. ते पोलिसांच्या पथ्यावर पडत असले तरी वडाचीवाडी येथील हीनु जानू पवार यांनी मंगळवार (दि.५ एप्रिल) रोजी एक दुभती गाय आणि दोन बैल चोरी गेली असल्याची लेखी तक्रार तळा पोलिस ठाणे येथे केली आहे या तक्रारीची दखल घेऊन पोलिसांनी तपास करून गुन्हेगारास अटक करण्याची मागणी शेतकरी वर्गा कडून केली जत आहे.

## भेंडखळ येथे श्री हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशारोहण सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील भेंडखळ गावात जिर्णोद्धार करण्यात आलेल्या श्री हनुमान मंदिरात मोठ्या भक्तिभावाने,धार्मिक कार्यक्रमाच्या माध्यमातून गुरुवार दि ७ एप्रिल २०२२ रोजी श्री हनुमान मुर्ती प्राणप्रतिष्ठा व कळशारोहण सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी अनेक भाविकांनी, ग्रामस्थांनी श्री हनुमंताची विधीपूर्वक पूजा अर्चा करण्यासाठी मंदिर परिसरात गर्दी केली होती.

उरण तालुक्यातील भेंडखळ गावातील ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या श्री हनुमान मंदिराची दुरवस्था झाली होती.सदर मंदिराच जिर्णोद्धाराचे काम भेंडखळ ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून हाती घेतले व अवघ्या एका वर्षात नव्या मंदिराची उभारणी केली. मंदिराचे जिर्णोद्धाराच काम पुर्ण झाल्याने सदर मंदिरात श्री हनुमान मुर्तीचा प्राणप्रतिष्ठा व कळशारोहण सोहळा ग्रामस्थांच्या सहकार्याने मोठ्या भक्तिभावाने धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून गुरुवार दि ७ एप्रिल रोजी पार पडला आहे. यावेळी अनेक भाविकांनी ग्रामस्थांनी श्री हनुमंताची उपासना, विधीपूर्वक पूजा अर्चा करण्यासाठी मंदिर परिसरात गर्दी केली होती.

# बिल्डर नलीन शहा व त्यांच्या मुलाविरोधात आणखी एक फसवणुकीचा गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तब्बल ४० लाख रुपये देऊन खारघर सेक्टर-२० मधिल शाह किंग्डम या गृहप्रकल्पातील फ्लॅटची बुकींग करणाऱ्या व्यावसायीकाला शाह ग्रुप बिल्डर्सने फ्लॅट अथवा फ्लॅटच्या बुकिंगची रक्कम परत न दिल्याने वाशी पोलिसांनी नवी मुंबईतील बांधकाम व्यावसायीक नलिन शहा व त्यांच्या मुलाविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे. याच बांधकाम प्रकल्पातील फ्लॅटची बुकींग करणाऱ्या मुंबईतील एका बांधकाम व्यावसायीकाची फसवणुक केल्याप्रकणी खारघर पोलिसांनी गत जानेवारी महिन्यामध्ये नलिन शहा व इतरांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

माणगाव येथे राहणारे व्यावसायीक हमजा अब्दुल्ला जलगावकर यांनी डिसेंबर २०१७ मध्ये शाह ग्रुप बिल्डर्सच्या खारघर सेक्टर-२० मधील शाह किंग्डम या इमारतीतील फ्लॅटची बुकींग केली होती. त्यावेळी शाह व त्यांचा मुलगा नरविन शाह यांनी २०१९ मध्ये फ्लॅटचा ताबा देण्याचे आश्वासन जलगावकर यांना दिले होते. त्यानुसार जलगावकर यांनी ४० लाख रुपये देऊन फ्लॅटची बुकींग केली होती. मात्र फ्लॅटचे अलाटमेंट लेटर देण्यास त्यांनी टाळाटाळ केली. मात्र जलगावकर यांनी शहा यांच्याकडे सतत पाठपुरावा केल्याने शहा यांनी जलगावकर यांना अलॉटमेंट लेटर दिले. मात्र बिल्डर नलीन शाह यांनी सदर इमारतीचे बांधकाम पुर्ण न केल्याने जलगावकर यांनी नलीन शाह यांच्याकडे विचारणा केली असता, त्यांनी लवकरच काम सुरु होणार असल्याचे सांगुन वेळ मारुन नेली. मात्र त्यांनी बाधंकाम सुरु केले नाही.

दरम्यान, जलगावकर यांच्या मुलीचे लग्न ठरल्याने त्यांना पैशांची गरज असल्याने त्यांनी शहा यांच्याकडे आपल्या पैशांची मागणी केली असता, त्यांनी टाळाटाळ सुरु केली. त्यामुळे जलगावकर यांनी फ्लॅटची बुकींग रद्द करुन आपले पैसे मागण्यास सुरुवात केली. त्यामुळे शहा पिता पुत्रांनी त्यांना मुलीच्या लग्नानंतर त्यांचे पैसे त्यांना परत देण्याचे आश्वासन देऊन त्यांना मित्र परिवाराकडून मुलीच्या लग्नासाठी पैशांची व्यवस्था करुन घेण्यास सांगितले. त्यानुसार जलगावकर यांनी मित्र परिवाराकडुन पैसे उधार घेऊन आपल्या मुलीचे लग्न केले. मात्र त्यानंतर देखील शहा यांनी जलगावकर यांना पैसे दिले नाहीत. त्यामुळे त्यांनी पोलीस उपआयुक्तांकडे तक्रार केल्यानंतर शहा पिता पुत्रांनी त्यांना १० लाख रुपये दिले. मात्र उर्वरीत ३० लाख रुपये देण्यास टाळाटाळ केली. त्यामुळे जलगावकर यांनी शहा पिता पुत्राविरोधात वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी नलिन शहा यांच्यासह त्यांचा मुलगा नरविन शहा या दोघांविरोधात फसवणुकीसह अपहाराचा गुन्हा दाखल केला आहे.

## ब्राह्मण सभेच्या अध्यक्षपदी भालचंद्र दातार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुका ब्राह्मण सभेच्या बुध. दि.६ एप्रिल २०२२ रोजी ॲड. स्वानंद दातार यांच्या निवासस्थानी झालेल्या सर्वसाधारण सभेत म्हसळा तालुका ब्राह्मण सभेच्या अध्यक्षपदी भालचंद्र दातार यांची एकमताने निवड झाली. अनेक वर्ष कार्यरत असलेले भास्करराव जोशी यानी राजीनामा दिल्यामुळे दातार यांची नियुक्ती झाली. भालचंद्र दातार हे LIC चा व्यवसाय व सेवा कार्य करीत असतानाच तालुक्यात ख्यातनाम भिक्षूक म्हणून नावाजीले जातात. त्यानी तालुक्यात पं.भालचंद्र उर्फ भालू (गुरुजी) म्हणून वेगळे स्थान निर्माण केले आहे, ते जिल्हा ब्राह्मण सभेचे संचालक असून, म्हसळा तालुका हिंदू ग्रामस्थ आणि शहर हिंदू ग्रामस्थ मंडळात महत्वाची भूमिका बजावतात.


Hon'ble Godase Madam

Adv Radha S

**PUBLIC NOTICE**

IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE
SENIOR DIVISION PANVEL

CIVIL M.A. NO. 381/2022
Exh : 7/D
N.D. 09/06/2022

Bhagavathy Vaidyanathan
Radhika Subramaninan
Omkar Subramanian — Applicants

Let it be known to all concerned that deceased **Late Shri. V.Subramanian** died on 24/08/2019. Therefore the applicants have filed the Misc. Application No. 381/ 2022, Application for Heirship Certificate Under the Provisions of Bombay Regulation Act VIII of 1827.

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**

A) 50% Share in a Shop, admeasuring about 345 sq.feet carpet area along with 103 Sq.feet loft, being shop No.39, National Complex, Plot No.B11 & B12 sector 6, New Panvel (East), Raigad District, 410206 Maharashtra.

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited. Then they may appear in person or through their Advocate, objecting this application in the Court of Civil Judge S.D. at Panvel, Dist. Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Sd/- Jr.Clerk Civil Court, Panvel — Court Seal — Sd/- Asstt.Superintent. Civil Court, Panvel

Sonawane J

Adv Radha S

**PUBLIC NOTICE**

IN THE HON'BLE COURT OF CIVIL JUDGE
SENIOR DIVISION PANVEL

CIVIL M.A. NO. 427 OF 2022
Exh : 8/D
Next Date : 09/06/2022

Petition for Probate of the last Will of
Late Mr. P.S.Vaidyanathan - Deceased

Bhagavathy Vaidyanathan - Petitioner

Let it be known to all concerned that deceased **Late Shri. P.S.Vaidyanathan** died on 18/01/2022. The Petitioner has filed the Misc. Application No. 427/ 2022, for Probate of the last will of Late Shri. P.S.Vaidyanathan under the Provisions of Indian Succession Act, 1955.

**SCHEDULE OF IMMOVABLE PROPERTY**

A) Residential Flat, admeasuring about 32.0 Sq. Mtrs built-up area, being Row House No.6, Vasundhara CHS, Plot No.C/18, Sector-6, New Panvel East, Raigad, Maharashtra-410206

B) Residential Flat, admeasuring about 32.0 Sq. Mtrs. built-up area, being Row House No.7, Vasundhara CHS, Plot No.C/18, Sector-6, New Panvel East, Raigad, Maharashtra-410206

If any person/s have any objection title, claim share, or any kind of interest in the said property, which is more particularly described in the schedule hereinabove, is hereby invited. Then they may appear in person or through their Advocate, objecting this application in the Court of Civil Judge S.D. at Panvel, Dist. Raigad, Maharashtra. If no one appears and objects for the same within 30 days from the date of publication of this notice then this Hon'ble Court will proceed to pass the necessary order thereon which please note.

Sd/- Jr.Clerk Civil Court, Panvel — Court Seal — Sd/- Asstt.Superintent. Civil Court, Panvel

**अर्जदाराचे अधिवक्ता**
**जयेश संभाजी म्हसे**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मा.जिल्हा न्यायाधिश पनवेल रायगड यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.२५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०९/०६/२०२२

**१) श्रीमती.कल्पना गंगाराम धुळे**
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
अर्जदार क्र.१ स्वतःकरिता व अर्जदार क्र.२ ची पालनकर्ती आई म्हणून
**२) कुमारी पुजा गंगाराम धुळे**
वय : ६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.सावळे, पोस्ट मांडवणे, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

सर्व लोकांस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार यांस **कुमारी पुजा गंगाराम धुळे**, वय : ५ वर्षे अशी मुलगी आहे. अर्जदार आणि **कुमारी पुजा गंगाराम धुळे** व त्यांचे सहधारक यांचे नावे खालील वर्णनाची अविभक्त सामाईक हिश्श्याकरिता मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : बार्डी, ता.कर्जत, जि.रायगड येथील बिनशेती मिळकत**

| अ.नं. | सर्वे नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १ | ६/१ | ०-८०-०० | ४-४५ |
| वरील क्षेत्रापैकी हे.आर.पॉ.०-१७-०० इतके क्षेत्र | | | |

(जिचा उल्लेख येथून पुढे पुनरुक्ती टाळण्याच्या उद्देशाने ''अर्ज मिळकत'' असा केलेला आहे.)

वर वर्णन केलेली मिळकत **कुमारी पुजा गंगाराम धुळे** हिचे पालनपोषणाकरिता, तिचे पुढील प्राथमिक व महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षणाकरिता आणि अर्जदार यांच्या आर्थिक अडचणीपोटी विक्री करणेची आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांनी **कुमारी पुजा गंगाराम धुळे** हिच्या अर्ज मिळकतीमधील असलेल्या अविभक्त हिश्याची नैसर्गिक पालक म्हणून विक्री करणेकरिता परवानगी मिळणेसाठी या मा.न्यायालयामध्ये अर्ज दाखल केलेला आहे. अर्जामध्ये केलेल्या मागणीप्रमाणे अर्जदार यांच्या हक्कास कोणचीही कसलीही हरकत असल्यास तसे त्यांनी लेखी पुराव्यासह या मा.न्यायालयात सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसात कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय पुरावा घेवून योग्य वाटल्यास अर्जदार यांस कुमारी पुजा गंगाराम धुळे हिची नैसर्गिक पालक म्हणून अर्ज मिळकतीमधील कुमारी पुजा गंगाराम धुळे हिचा अविभक्त हिस्सा विक्री करणेची परवानगी देईल. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**सही/- क.लिपीक जिल्हा न्याया. पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक जिल्हा न्याया. पनवेल**

मा.मुजावर साहेब कोर्ट

**ॲड.गिरीश शं. पाटील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ/क.स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.५१६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०९/०६/२०२२

**१) श्री.वामन कृष्णा कडू**
**२) श्री.संजय कृष्णा कडू**
अ.नं.१ ते २ रा.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड
**३) सौ.गिता विनायक नाईक**
रा.वहाळ, पो.उलवा, ता.पनवेल, जि.रायगड
**४) कै.भारती हरिश्चंद्र ठाकूर (मयत) तर्फे वारस**
**४/१) श्री.कुणाल हरिश्चंद्र ठाकूर**
**४/२) कु.नम्रता हरिश्चंद्र ठाकूर**
अ.नं.४/१ ते ४/२ रा.धुतूम, जासई, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील आणि अर्जदार नं.४/१ ते ४/२ यांचे आजोबा आणि **कै.विठाबाई कृष्णा कडू** यांचे पती म्हणून **कै.कृष्णा चांगू कडू** हे दि.२८/०४/२०१५ रोजी मु.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. तसेच त्यांची पत्नी आणि अर्जदार नं.१ ते ४ यांची आई आणि अर्जदार नं.४/१ ते ४/२ यांची आजी म्हणून **कै.विठाबाई कृष्णा कडू** ह्या दि.१७/१०/२०१८ रोजी मु.पो.न्हावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच त्यांची मयत मुलगी आणि अर्जदार नं.१ ते ३ यांची बहिण आणि अर्जदार नं.४/१ ते ४/२ यांची आई म्हणून **कै.भारती हरिश्चंद्र ठाकूर** ह्या दि.२२/०५/२०२० रोजी धुतूम, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. वरील मयत व्यक्तीपैकी **कै.कृष्णा चांगू कडू** यांच्या मृत्यूसमयी नावाची नोंद असलेल्या खालील वर्णाची जमीन मिळकती ह्या वडिलोपार्जित मिळकती असून त्या शासनातर्फे सिडकोने भूसंपादीत केल्या आहे. सदरहू मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गाव/ॲवॉर्ड क्र. | स.नं./हि.नं. | क्षेत्र ए.गु.आर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | न्हावे ॲवॉर्ड नं.५० | अे/९२ | १-०९-१२<br>०-०-४<br>१-१०-६ | ०-५०-६ | २-३१ |
| | | अे ७७५ | ०-१३-८ | ०-१३-७ | ०-६७ |
| | | अे ७९२ | ०-१४-० | ०-१४-० | ०-७० |

येणेप्रमाणे जमीन मिळकती आहेत. वरील मिळकती ह्या सिडकोने नव्या मुंबई योजनेकरिता भूसंपादन करून घेतली आहे. सदरहू मिळकतीचे ॲवॉर्ड हे वरील अर्जदार नं.१ ते ४ यांचे वडील आणि अर्जदार नं.४/१ ते ४/२ यांचे आजोबा आणि **कै.विठाबाई कृष्णा कडू** यांचे पती म्हणून **कै.कृष्णा चांगू कडू** यांचे नावाने प्रसिद्ध झालेले आहेत. सदरहू जमीन मिळकतीमध्ये त्यांचे पश्चात अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असून त्यांचा अविभाज्य हिस्सा असून अर्जदार यांस जमिनीच्या मोबदल्यात देण्यात येणारे विकसित भूखंड हे त्यांचे वारस यांना देण्यासाठी त्यांचे कायदेशीर वारसदार म्हणून अर्जदार यांनी तसा कायदेशीर वारसपत्र या सिडको कार्यालयाकडे सादर करणेकरिता व वारस नोंद होणेकरिता आवश्यक तो लागणारा वारसदाखला मिळावा म्हणून वरील अर्जदार यांनी या न्यायालयात सदरचा चौकशी अर्ज मुंबई रेग्युलेशन ॲक्ट VIII ऑफ १८२७ अन्वये दाखल केलेला आहे. त्यांची वारसनोंद होणे अत्यंत गरजेचे आहे.

त्याअर्थी अर्जदारांचे मागणीप्रमाणे त्यांना वारसदाखला देणेस कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास संबंधितांनी स्वतः अगर वकीलामार्फत या न्यायालयात ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत हजर राहून आपले म्हणणे, हरकत अगर साक्षीपुरावे द्यावेत. अन्यथा योग्य त्या चौकशीअंती अर्जदारांनी त्यांचे कथन सिद्ध केल्यास त्यांचे मागणीप्रमाणे त्यांना वारसदाखला देण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आज दि.०७ माहे ४ सन २०२२ रोजी माझे सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## डॉ.प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय पनवेलतर्फे कै.नीलाताई पटवर्धन प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम

दै.रायगड नगरी । पनवेल

रा.स्व. संघ जनकल्याण समिती डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालय पनवेल तर्फे कै. नीलाताई पटवर्धन प्रथम पुण्यस्मरण व अभिवादन कार्यक्रम सोमवार दि . ११ एप्रिल २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता जेष्ठ नागरिक हॉल पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.गिरीश गुणे, प्रमुख वक्ता डॉ. समिधा गांधी हे उपस्थित राहणार आहेत. तरी याकार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे असे आव्हान अध्यक्ष डॉ.रवींद्र इनामदार व कार्यवाहक राजीव समेळ यांनी केले आहे.

## चौक येथील मंदिरात रामनवमी उत्सवाचे आयोजन

दै.रायगड नगरी । चौक

महाराष्ट्र कोरोना निर्बंध मुक्त झाल्यामुळे सुमारे दोन वर्षांपासून बंद असलेले धार्मिक कार्यक्रम आता मोठ्या जल्लोषात साजरे केले जाणार आहेत.

येत्या १० एप्रिल चैत्र शुद्ध नवमी रोजी श्री राम जन्मोत्सव येत असून चौक कोल्हापूर पेठ येथील श्री राम मंदिरात मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनाचा लाभ घेत असतात हा कार्यक्रम यावर्षी कोल्हापूर पेठ चौक येथील ग्रामस्थ साजरा करणार असून पहाटे ५ ते ७ (काकड आरती ) ७ ते ९ (श्रींची पूजा, अभिषेक) १०ते १२( राम जन्मोत्सव) किर्तन ह.भ. प. प्रभाकर महाराज सालेकर सायंकाळी ६ते ७ (हरिपाठ) ९ ते १० आदर्श भजनी मंडळ कोल्हापूर, यांचे संगीत भजन होणार असून सर्व भक्तांनी या सेवेचा व दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रामस्थ व आदर्श महिला मंडळातर्फे करण्यात येत आहे.

## खरसई येथे जागतिक आरोग्य दिन संपन्न

दै.रायगड नगरी । म्हसळा

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आज दिनांक ७ एप्रिल २०२२ खरसई येथे जागतिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला.

या निमित्ताने खरसई येथे नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले यावेळी नेत्र चिकित्सक डॉ नलिनी जाधव, पाटील क्षयरोग तंत्रज्ञ, थळे STLS, सरपंच खरसई निलेश मांदाडकर, उपसरपंच इम्रान अकलेकर, भास्कर कांबळे, श्रीम गायकवाड, कोल्हे, श्रीम ढंगारे, श्रीम निवळकर, श्रीम हर्षाली शीतकर, नीलम पयेर , निर्मला पयेर, श्रीम श्रद्धा कांबळे आदि मान्यवर उपस्थित होते.

# जेष्ठ नागरिकांची बतावणी करून फसवणूक करणाऱ्या गुन्हेगारांना अटक

दै.रायगड नगरी । पनवेल

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयमध्ये जेष्ठ नागरिकांना एकटे गाठुन पुढे अपघात झाला आहे. चोरी झाली आहे. दंगल चालु आहे अशी खोटी माहिती देवून हातचलाकी करून पोलीस असल्याची बतावणी करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने व रोख रक्कम फसवणूक करणारे दोन गुन्हेगारांना व अशी चोरीची मालमत्ता विकत घेणा-या ज्वेलर्सला गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल यांनी अटक करून अशा प्रकारचे एकुण २५ गुन्हे उघडकीस आणुन २००.५० ग्रॅम सोन्याचे दागिण्यांसह १०,२५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.




मागील दोन वर्षांत जेष्ठ नागरीकांना बतावणी करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम फसवणूक केल्याबाबतचे काही गुन्हे नवी मुंबई आयुक्तालयात दाखल झाले होते. जेष्ठ नागरीकांमध्ये पोलीसा विषयी विश्वास व सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी सदरचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह, सह पोलीस आयुक्त डॉ. जय जाधव, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), महेश घुर्ये, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सुरेश मेंगडे यांनी आदेशीत केले होते. त्याप्रमाणे सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या टिम तयार करण्यात आल्या होत्या. गुन्हे शाखा कक्ष २, पनवेल चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गिरीधर गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद गुन्ह्यांतील घटनास्थळ, जेष्ठ नागरीकांना केलेली बतावणी, परीसरातील सीसीटिव्ही कॅमेरे व गोपनिय बातमीदार यांच्या मार्फत गुन्हे शाखा कक्ष २ चे अधिकारी व अमलदार तपासकरीत असताना पोलीस उप निरीक्षक मानसिंग पाटील यांना मिळालेल्या बातमी अन्वये खालील दोन आरोपी व गुन्ह्यातील चोरीचा माल विकत घेणाऱ्या ज्वेलर्स यांना अटक करण्यात आली आहे. यामध्ये युसुफ सलीम सैय्यद, वय २४ वर्षे, रा. गुलशन चाळ, वैष्णव माता मंदिराचे मागे, बनेली, टिटवाला पुर्व, ता. कल्याण, गणेश प्रभाकर शिंदे, वय ४० वर्षे (रिक्षाचालक) रा. साईकृष्णा चाळ, रुम नंबर १, पाण्याचे टाकी जवळ, मोहिली गाव, ता. कल्याण, सुरज मंजुनाथ रेवणकर, वय ३० वर्षे, व्य. ज्वेलर्स, रा. विमलेश्वर निवास, बॅरेक नंबर ६६९, तेज बहादुर कॉलनी, उल्हासनगर नंबर ३, जि. ठाणे नमुद अटक आरोपी हे त्यांचा एक साथीदार गुन्ह्यातील पाहिजे आरोपी याच्यासह सदरचा गुन्हा करत असल्याबाबत त्यांनी कबुली दिली आहे. सदरचा गुन्हा हे नमुद आरोपी शहरातील बाजारपेठ, रेल्वे स्टेशन, वॉकिंग ट्रॅक, गार्डन या परीसरात जेष्ठ नागरीकांना एकटे गाठुन त्यांना पुढे अपघात झाला आहे, चोरी झाली आहे, दंगल चालु आहे अशी खोटी माहिती देवून पोलीस असल्याची बतावणी करून त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम हे त्यांच्या जवळ असलेल्या एखादया रुमालामध्ये अथवा कागदामध्ये गुंडाळुन हातचलाखी करून सदरचे दागिने लंपास करीत असत. नमुद आरोपींनी फसवणूक केलेले सोन्याचे दागिण्यांपैकी काही दागिणे ज्वेलर्स सुरज मंजुनाथ रेवणकर यास विकी केले आहेत. सदरचे दागिने हे गुन्ह्यातील असल्याचे माहित असूनही ते विकत घेतल्याबाबत नमुद ज्वेलर्स नामे सुरज रेवणकर यास सदर गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आली आहे. अटक आरोपी कडुन गुन्हे शाखा कक्ष २ यांनी अंदाजे १०,२५,०००/- रुपये किंमतीचे एकुण २००.५० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिणे हस्तगत केले असून एकुण २५ बतावणीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

## अंदापत्रकानुसार कमी दराने झालेल्या कामांची गुणवत्ता व टिकावूपणा तपासून नि:पक्षपाती चौकशी करण्याची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

अंदापत्रकानुसार कमी दराने झालेल्या कामांची गुणवत्ता व टिकावूपणा तपासून नि:पक्षपाती चौकशी करण्याची मागणी शिवसेना शहर संघटक भरत पाटिल यानी मुख्यमंत्री आणि सिडकोकडे केली आहे.



सिडकोचे कार्यकारी अभियंता,(खारघर १) हे अतिशय वेगाने काम करीत असल्याचे चित्र उभे करीत आहेत. परंतु चित्र उभे करताना अनेक प्रकल्पग्रस्त ठेकेदारांवर अन्याय करीत असल्याचे स्पष्ट दिसून येत आ-हेत. त्यांच्या वेगाने केलेल्या कामांचा जनमानसात ठसा दिसून येत नाही. सिडकोच्या कल्याणकारी धोरणानुसार स्थानिक प्रकल्पग्रस्तांना नियमानुसार ए २ अंतर्गत कामे अंदापत्रकानुसार करता येवू नये म्हणून काही ठराविक मर्जीतील ठेकेदारांना बिलो दराने कामे मंजूर करून कामांची गुणवत्ता अथवा काम पूर्ण केल्याचे दिसून येत नाही, सध्या अर्थिक मंदीच्या काळात कामे करताना बांधकाम साहित्याचे भाव गगनाला भिडले असताना बिलो दराने कामांचे ठेके देत आहेत. आजची अर्थिक स्थिती भयावह असून बिलो दरामध्ये कामे देवून कशी परवडतात हा एक हा संशोधनाचा विषय आहे.

आजच्या परिस्थितीत लोखंड, सिमेंट, रेती, खडी, यंत्रसामुग्री, कामगार यांचे दर अनेक पटीने वाढले असताना, आजच्या बाजारभाच्या किमतीनुसार, निम्या किमतीत काही कामे करून घेत असल्याचे अनेक उदाहरणे आहेत. सिडकोचे कार्यकारी अभियंता (खारघर-१) यांच्या कार्यकाळात ठराविक ठेकेदार वारंवार ५०% पेक्षा अधिक बिलो दरात कामे घेत असून पूर्ण करीत आहेत. याबाबत सखोल चौकशी करून त्रयस्त एजन्सी मार्फत अथवा दक्षता कमिटी मार्फत बिलो दरातील कामांचे मुल्यांकन होणे आवश्यक व गरजेचे आहे, जेणेकरून सर्व परिस्थिती बाहेर येईल. असे शिवसेना शहर संघटक भरत पाटिल यांचे म्हणणे आहे.

तसेच प्रकल्पग्रस्तांमध्ये फुटीचे व भ्रष्ट राजकारण न करता समान न्याय मार्गाचा अवलंब करून सर्व स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदारांना सिडकोच्या नियमानुसार कामे मिळणेबाबत नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळ बिलो दर पध्दतीने कामे घेणा या प्रकल्पग्रस्तांच्या लॉबीला सुध्दा कामांची जाणीव होईल.असे सिड्को तसेच मुख्यमंत्री याना दिलेल्या निवेदनात भरत पाटिल यानी म्हटले आहे.

## संजय बियाणी यांच्या हत्येच्या निषेधार्थ कर्जत माहेश्वरी युवा मंडळाचे पोलीस प्रशासनास निवेदन

दै.रायगड नगरी । कर्जत

सामाजिक कार्यकर्ते संजय बियाणी यांच्या हत्येच्या निषेधार्थ कर्जत माहेश्वरी युवा मंडळाचे पोलीस प्रशासनास निवेदन देण्यात आले.

राष्ट्राच्या आणि राज्याच्या विकासास माहेश्वरी समाजाचे अमुल्य असे योगदान लाभले असुन माहेश्वरी समाजातील अनेक दानशुर व्यक्तिमत्वांमुळे सर्व समाजाच्या पाठीशी माहेश्वरी समाज सदैव उभा राहत असतो. असे असताना माहेश्वरी समाजातील दानशुर व्यक्तींसह व्यापारी वर्गावर खुनी हल्ले करून त्यांच्यावर नाहक अत्याचार केला जात आहे. अशाचप्रकारे माहेश्वरी समाजातील नांदेड येथील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठीत व्यक्तीमत्व तसेच प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांची काल नांदेड येथे दिवसाढवळ्या गोळ्या घालुन हत्या करण्यात आली. संजय बियाणी यांनी सुमारे ७३ गरजु कुटुंबांना स्वखर्चाने घरे बांधुन देऊन त्यांना हक्काचा निव-ारा उपलब्ध करून दिला होता. अशा सहृदयी व्यक्तीची हत्या झाल्याने त्यांची हत्या करणाऱ्या आरोपींना तात्काळ अटक करुन जलदगती न्यायालयाद्वारे खटला चालवण्यात यावा.

या मागणीसाठी कर्जत माहेश्वरी युवा मंडळातर्फे उपविभागीय पोलिस अधिकारी विजय लगारे व कर्जत पोलिस स्टेशनच्या पोलिस निरिक्षक सुवर्णा पत्की यांना निवेदन देण्यात आले. सदर प्रसंगी कर्जत माहेश्वरी युवा मंडळाच्या मंगला राठी, योगीता चांडक, अश्लेशा भुतडा, वनीता सोनी, योगेश राठी, गणेश डागा, रामेश्वर राठी, अमित चांडक, संदेश भुतडा, लक्ष्मीकांत सोनी, महेश सारडा, मयुर डागा, निलेश डागा, संदिप चांडक आदि कार्यकर्ते उपस्थित होते.

## माथेरानमध्ये शिवसेना नागरिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध आहे : चंद्रकांत चौधरी

दै.रायगड नगरी । माथेरान

सर्वसामान्य लोकांना अनेकदा शासकीय कामासाठी यामध्ये आधारकार्ड, पॅन कार्ड असो, की ई श्रम कार्ड असो यासाठी कर्जत वा अन्य ठिकाणी जावे लागते. ही खूपच खर्चिक बाब असल्याने यासाठी आम्ही येथील सर्व नागरिकांना या सोयी इथेच कशाप्रकारे उपलब्ध होऊ शकतात याच प्रयत्नात आहोत त्यासाठी शिवसेना पक्षाचे पदाधिकारी, महिला आघाडी, युवा, युवती सेनेचे पदाधिकारी त्याचप्रमाणे आजी, माजी लोकप्रतिनिधींसह सर्व कार्यकर्ते नेहमीच कटिबद्ध आहेत असे मत शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी व्यक्त केले.



कर्जत-खालापूर मतदार संघाचे कार्यसम्राट आमदार महेंद्रशेठ थोरवे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवसेना शाखेत आयोजित केलेल्या मोफत ई श्रम कार्ड आणि आधार कार्ड शिबिराच्या प्रसंगी ते बोलत होते. तर यापुढेही सर्वसामान्य गरजवंत लोकांना आगामी काळात जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सुध्दा शिवसेनेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.यामध्ये कोणत्याही प्रकारचा राजकीय हेतू नसून ही एक जनसेवा म्हणून आम्ही हे व्रत जोपासण्याचा प्रयत्न करत आहोत असेही चंद्रकांत चौधरी यांनी स्पष्ट केले.

तर पक्षाला बळकटी देण्यासाठी त्याचप्रमाणे नागरिकांच्या समस्या दूर करण्यासाठी शिवसेना नेहमीच अग्रेसर भूमिका पार पाडत आहे असे वसंत कदम यांनी आपल्या छोटेखानी भाषणात स्पष्ट केले. सकाळी अकरा वाजता शिवसेना शाखेत या स्तुत्य कार्यक्रमाच्या सुरुव-ातीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला पतसंस्था संचालिका स्मिता संदीप शिंदे यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला संघटक संगीता जांभळे, सुहासिनी शिंदे, श्रुतिका दाभेकर, स्मिता शिंदे, माजी नगरसेविका कीर्ती मोरे यांच्या शुभहस्ते केक कापण्यात आला. याप्रसंगी उप शहरप्रमुख प्रमोद नायक, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, संदीप शिंदे, ज्ञानेश्वर बागडे, वनसमिती अध्यक्ष योगेश जाधव, अनिस शेख, संतोष खाडे, शैलेश वाघेला, जानू आखाडे, वसंत कदम, युवा सेनेचे निखील शिंदे, खालिद शेख,अनिकेत जाधव, दर्शन घाग, अमोल चौगुले, किशोर धनावडे यांसह धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांसह अन्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार महेंद्र शेठ थोरवे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक ७ आणि ८ एप्रिल या दोन दिवशी हे महत्व-पूर्ण शिबीर नागरिकांसाठी असून ई श्रम कार्ड ताबडतोब दिले जात आहे त्यामुळे नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्यासाठी गर्दी केली आहे.

शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या मीरा फाऊंडेशनच्या माध्यमातून दर महिन्याला निराधार, विधवा महिलांना तसेच ज्यांच्या घरात कुणीही कमावती व्यक्ती नाही अशा गरजवंत लोकांना एक हजार रुपये पेन्शन स्वरूपात दिली जाते. याचा लाभ सुध्दा जवळपास दोनशे पेक्षाही अधिक लोकांना होत आहे. गावातील अनेक आजारी व्यक्तींना मोफत औषधे सुध्दा नियमितपणे पुरवली जात आहेत. राजकारणाला बगल देऊन या लहानशा गावातील गोरगरिबांना शक्य तितकी मदत चंद्रकांत चौधरी यांच्या माध्यमातून केली जात आहे त्यामुळे त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. या त्यांच्या निस्वार्थी कार्यपद्धतीवर खुश होऊन आमदार महेंद्र शेठ थोरवे यांनी फोन करून चंद्रकांत चौधरी यांचे अभिनंदन केले.

## पार्टेकोंड-सावंतकोंड रस्त्यावरील लोखंडी पूलाची नटबोल्ट कापून चोरी

दै.रायगड नगरी । पोलादपूर

तालुक्याच्या मुख्य गावाची ग्रामपंचायत असलेल्या पोलादपूरमध्ये नगरपंचायत झाल्यानंतर झालेल्या रस्त्यामुळे वापरात नसलेला लोखंडी पूल सोमवारी काही व्यक्तींनी ग्रामस्थांच्या डोळ्यांदेखत कापून एका परिचित वाहनातून चोरून नेल्यानंतर बुधवारी पोलादपूर नगरपंचायतीच्या विरोधी गटनेत्यांनी मुख्याधिकारी महादेव रोडगे यांच्याकडे लेखी तक्रारवजा निवेदन देऊन संबंधितांविरूध्द कारवाईची मागणी केली आहे. पोलादपूर तालुक्यात यापूर्वीही लोखंडी पूल चोरी करणाऱ्याचा फोटो गळ्यामध्ये पाटी बांधून पोलादपूर पोलीस ठाण्यातील काचेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात आला असताना आता काय घडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



पोलादपूर ग्रामपंचायतीने पार्टेकोंड-सावंतकोंड भागातील विद्यार्थी तसेच ग्राम स्थांना पायी तसेच दुचाकीवरुन शहराशी संपर्कात राहण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत साध-ारणपणे १०-१२ फूट लांबीचा आणि ६ फूट रुंदीचा एक लोखंडी पूल बांधून घेतला होता. यानंतर नगरपंचायत अस्तित्वात आल्यावर या पार्टेकोंड सावंतकोंड भागात रस्ता करण्यात आल्याने या लोखंडी पुलावरील रहदारी बंद झाली. गेल्या काही वर्षांपासून वापराविना असलेल्या या लोखंडी पुलाकडे रस्त्यावरून जाणाऱ्या व येणाऱ्या स्थानिक लोकांचे लक्ष असे. सोमवारी सायंकाळी पोलादपूर नगरपंचायतीचा लोकप्रतिनिधी याठिकाणी येऊन पाहणी करून गेला आणि रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास एक ओळखीचे वाहन येऊन गेले. दुसऱ्या दिवशी मंगळवारी हा लोखंडी पूल नटबोल्ट कापून चोरीला गेल्याचे स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात आले. याबाबत पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधी गटनेता दिलीप भागवत, नगरसेवक स्वप्नील भुवड आणि अॅड.सचिन हांडे यांच्या निदर्शनास ही बाब स्थानिक ग्रामस्थांनी आणून दिल्यानंतर या चोरीस गेलेल्या लोखंडी पुलासंदर्भात माहिती घेतल्यानंतर रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने हा पूल बांधल्यानंतर नगरपंचायतीची निर्मितीनंतर हा पूल नगरपंचायतीकडे वर्ग केल्याचे समजून आल्याने पोलादपूर नगरपंचायतीच्या विरोधी गटनेते दिलीप भागवत यांच्या लेटरपॅडवरून मुख्याधिकारी पोलादपूर नगरपंचायत यांना सदर लोखंडी पुलाच्या चोरीसंदर्भात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

## श्री रत्नेश्वरी मंदिर परिसरातील तलावात प्लास्टिक पिशव्यांचा खच

दै.रायगड नगरी । उरण

प्लास्टिक व कचरा मुक्त जेएनपीटी प्रकल्पग्रस्त बाधित ग्रामपंचायती करण्याचा संकल्प बंदर प्रशासनाने हाती घेतला आहे.त्यासाठी जेएनपीटी बंदराच्या प्रशासनाने लाखो रुपये खर्च करून जसखार ग्रामपंचायत हद्दीत घन कचरा प्रकल्पाची उभारणी २०२०-२०२१ यावर्षी केली. परंतु लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या जसखार ग्रामपंचायत हद्दीतील श्री रत्नेश्वरी मंदिर परिसरातील तलावात प्लास्टिक पिशव्यांचा, कचऱ्याचा खच पडला असल्याने प्रकल्पग्रस्त नागरीक, भाविकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना स्वच्छतेचा संदेश दिला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका, जिल्हा परिषद, नगर परिषद, नगर पंचायत, पंचायत समिती, ग्रामपंचायत, प्रकल्प व्यवस्थापन यांनी पुढाकार घेतला आहे. त्याच धर्तीवर एक पाऊल पुढे टाकत जेएनपीटी बंदराच्या प्रशासनाने बंदर परिसरात स्वच्छतेसाठी करोडो रुपये खर्चून अनेक उपक्रम हाती घेतला आहे. तसेच जेएनपीटी प्रकल्पग्रस्त बाधित ग्रामपंचायतीमधील कचरा, प्लास्टिक पिशव्यांचा खच हटविण्यासाठी व त्यापासून खत इतर उत्पादने घेण्यासाठी जसखार ग्रामपंचायत हद्दीत लाखो रुपये खर्च करून घन कचरा प्रकल्पाची उभारणी २०२०-२०२१ यावर्षी केली आहे.

परंतु जेएनपीटी बंदराच्या व स्थानिक ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षित कारभारामुळे लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री रत्नेश्वरी मंदिर परिसरातील तलावात प्लास्टिक पिशव्यांचा, कचऱ्याचा खच पडला असल्याचे भयानक चित्र पहावयास मिळत आहे. श्री रत्नेश्वरी देवीचा पालखी, जत्रा उत्सव यावर्षी २४ एप्रिल रोजी येत आहे. त्या अगोदर सदर तलावातील कचरा प्लास्टिक पिशव्यांचा खच हटविण्यासाठी जेएनपीटी बंदराने, ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला नाही तर त्याचा त्रास हा प्रकल्पग्रस्त नागरीकाबरोबर भाविकांना सहन करावा लागणार आहे. अशी प्रतिक्रिया भाविकांमध्ये, रहिवाशांमध्ये उमटत आहे.



## साळाव -मुरुड रस्त्यावरील दांडा निवारा शेड नजिक खड्डा धोकादायक

दै.रायगड नगरी । कोर्लई

साळाव -मुरुड रस्त्यावरील दांडा निवारा शेड नजिक असलेल्या मोरीवरील रस्त्याला पडलेला खड्डा अपघाताला आमंत्रण ठरत असून याकडे संबंधित सार्वजनिक बांधकाम खात्याचे दुर्लक्ष असल्याबद्दल नाराजी व्यक्त होत असून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांच्यावतीने ग्रामस्थ विनोद सुर्वे यांनी केली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून साळाव -मुरुड रस्त्यावरील दांडा गावानजीक निवारा शेड नजिक असलेल्या मोरी वरील रस्त्याला लागून पडलेल्या या खड्ड्यामुळे टू -व्हीलर,थ्रि-व्हीलर तसेच अन्य वाहनांना अपघाताला सामोरे जावे लागले असून यामुळे वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

शासनाच्या संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी वर्गाने याची दखल घेऊन योग्यती उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांच्यावतीने ग्रामस्थ विनोद सुर्वे यांनी केली आहे.

